# तळ नितळ

लक्ष्मीकांत तांबोळी

प्रकाशन क्रमांक
५४५

■ **तळ नितळ**
**लक्ष्मीकांत तांबोळी**
'रविराज'
५०, भाग्यनगर, नांदेड.
(०२४६२) २६४९७८
भ्र.९६६५८९९६२७

■ प्रथमावृत्ती :
**८ ऑक्टोबर २०१९**
(विजयादशमी)

■ सर्व हक्क :
**लेखकाधीन**

■ प्रकाशक :
**दत्ता डांगे**
इसाप प्रकाशन,
'कांचनब्रह्म'
१९०, सहयोगनगर, नांदेड
भ्र. ९८९००९९५४१

■ अक्षरजुळणी :
**गिरीश कहाळेकर**
श्रीकर ग्राफिक्स, नांदेड.

■ मुखपृष्ठ :
**नयन बाराहाते**

■ मुद्रक :
**मधुराज प्रिंटर्स प्रा.लि.**
धायरी, पुणे.

**मूल्य : २५०/- ₹**

# अनुक्रमणिका


१. असा एक दे शब्द! .......................................... ५
२. शब्द निरागस हो .......................................... १०
३. शब्दांची पहाट .......................................... १६
४. चूक-भूल आता द्यावी-घ्यावी .......................................... २१
५. व्यर्थ सेतू बांधले .......................................... २६
६. असा मी, असा मी... .......................................... ३१
७. कवी थोडे, कवडे फार! .......................................... ३५
८. कविता नावाचे प्रकरण .......................................... ३९
९. कवितेचा डोळा .......................................... ४४
१०. मन माझे मोकळे .......................................... ४९
११. शब्दांनो, मागुते या... .......................................... ५३
१२. कवितेचा 'झपूर्झा' .......................................... ५७
१३. एका गीताची (वाट) चाल .......................................... ६२
१४. विसराल तर घसराल! .......................................... ६६
१५. अस्सलाशी गाठ .......................................... ७०
१६. सैराट मराठी .......................................... ७५
१७. वार्ताहरी प्रथमोध्यायः .......................................... ८०
१८. ब्रह्मार्पणमस्तु .......................................... ८५
१९. सर्वसुखाचे आगर .......................................... ९०
२०. जय देवा नरहरी .......................................... ९५
२१. यावे सहज मरण .......................................... १००
२२. सहा आंधळे आणि हत्ती .......................................... १०४
२३. ऋषीचे कूळ आणि नदीचे मूळ .......................................... १०८
२४. इंद्राय - तक्षकाय स्वाहा! .......................................... ११३
२५. गंगाजळ हृदय करा .......................................... ११८
२६. वैराग्यभोगी रामदास आणि अध्यात्मयोगी तुकाराम .......................................... १२२
२७. एक तुतारी द्या मज आणुनी! .......................................... १२७
२८. आनंदओवरीचे स्वामी .......................................... १३२
२९. मरणव्यूह .......................................... १३७
३०. मराठवाडी मानध्वजा .......................................... १४१
३१. परभणी नव्हे पायाभरणी .......................................... १४५
३२. माझी वाट, माझी चाल .......................................... १४९
३३. आम्ही जातीचे ब्राह्मण .......................................... १५५

''उत्पत्स्यते मम कोऽपि समानधर्मा
कालो ह्ययं निरवधिर्विपुला च पृथ्वी''

– भवभूति



# असा एक दे शब्द!

काळ अवकाळ. दिवस असे अंगावर आलेले. सगळ्यांचेच हात उगारलेले. कुठेही जा, नुसती मारझोड. कुठेही पाहा, केवळ मोडतोड आणि केव्हाही, कशानेही सदैव झोपमोड! तर असा हा अवकाळ.

संवत्, शके, इसवी सन, संवत्सरे येतात जातात. त्यांना त्यांची नावे पण असतात. मुहूर्त असतात. सन, संवत्सर म्हणजे काळाचा एक तुकडा. तोही आपणच आपल्या सोयीसाठी केलेला.

तसेच पूर्व, पश्चिम, उत्तर, दक्षिण, ईशान्य, वायव्य, अग्नेय, नैर्ऋत्य वगैरे दिशा आपणच ठरविलेल्या. शिवाय वर आणि खाली आहेच. दिवस, रात्र, घटिका, पळ, काय काय मागे लावून घेतले ते कळत नाही. एकूण काळ हा असा कानीकपाळी ठणठण वाजत असतो. 'तास वाजे ठणाणा...' म्हणतात ते हेच. घटका, पळे जातात. तासातासाला ठणठणाट.... वाजवणारा ठणठणपाळ! ठणठणपाळ म्हणजे मूर्ख, दरिद्री, कफल्लक अगदीच 'गयाळ' म्हणजे गचाळ,